www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३३ वा शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# नमो चषक क्रीडा महोत्सवाला राष्ट्रीय विक्रमवीर आणि

## आशियातील सर्वोत्कृष्ट धावपटू ललिता बाबर यांची भेट




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

भारताची राष्ट्रीय विक्रमवीर आणि आशियातील सर्वोत्कृष्ट धावपटू ललिता बाबर यांनी उलवा नोडमध्ये सुरु असलेल्या नमो चषक स्पर्धेला सदिच्छा भेट दिली. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी ललिता बाबर यांनी या स्पर्धेच्या भव्य आणि दर्जेदार आयोजनाबद्दल कौतुक केले. त्यांच्या या भेटीने खेळाडूंमध्ये स्फूर्तीचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, स्वप्नील ठाकूर,युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, दिनेश खानावकर, देवांशू प्रभाळे, सुधीर ठाकूर, धीरज उलवेकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# मुंबई उपनगरच्या उमेश गुप्ताने पटकावला

## राज्यस्तरीय शरीरसौष्ठव 'नमो चषक २०२५ किताब'







**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भव्य दिव्य आयोजन आणि स्पर्धकांच्या उत्कृष्ट प्रदर्शनामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत दिमाखदारपणे झालेल्या राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत मुंबई उपनगरच्या उमेश गुप्ता याने 'नमो चषक २०२५ किताब' पटकाविला. १ लाख ११ हजार रुपये आणि चषकाचा तो मानकरी ठरला. भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने २३ ते २५ जानेवारी पर्यंत 'भव्य क्रीडा महोत्सव' अर्थात 'नमो चषक २०२५' चे भव्य दिव्य आयोजन उलवा नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या मागील बाजूच्या मैदानावर अर्थात लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग असलेली राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा उत्स्फूर्तपणे व उत्कृष्ट नियोजनात आणि क्रीडा रसिकांच्या उपस्थितीत जल्लोषात पार पडली. या स्पर्धेसाठी प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मोरे, सरचिटणीस अजय खानविलकर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व नमो चषक स्पर्धेचे मुख्य आयोजक परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, पनवेल **पान ४ वर**

# दैनिक युवक आधार दिनदर्शिका 2025 प्रकाशन सोहळा आयोजित

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

कोकणच्या लाल मातीशी नाळ जोडलेले संपादक श्री. संतोष आमले साहेब आणि दादासाहेब फाळके पुरस्कार 2025 प्राप्त सन्माननीय श्री. शिवदास आमले यांच्या प्रेरणेतून तसेच कार्यकारी संपादक सुरेश भोईर, उपसंपादक विलास गायकवाड सहसंपादक मुकुंद कांबळे महाराष्ट्र प्रतिनिधी प्रमुख प्रदीप पाटील महाराष्ट्र संपादक अजय कापरे निवासी संपादक राकेश पाटील कोकण विभाग प्रमुख विजय दूंद्रेकर पनवेल तालुका प्रतिनिधी प्रमुख निजाम सय्यद मराठवाडा विभाग संपादक जगन्नाथ रासवे मराठवाडा विभागीय प्रतिनिधी प्रमुख राजू शिंदे मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख किशोर गुडेकर रायगड जिल्हा प्रतिनिधी प्रमुख मनोहर भोईर यांच्या सहकार्यातून दैनिक युवक आधार दिनदर्शिका 2025 या वृत्तपत्राचे उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले साहेब यांचे उत्तम नियोजन,प्रचंड मेहनत आणि आई ग्रुपच्या ऐक्याचा सामाजिकतेचा प्रचंड असा महामेरू यामुळे दैनिक युवक आधार वृत्तपत्राचा दिनदर्शिका सोहळा जल्लोषात संपन्न करण्याचे आयोजित केले आहे. पुष्पहारातला दोरा जसा महत्वाचा असतो तसे नेतृत्व खूप महत्त्वाचे असते दैनिक युवक आधार संपादक संतोष आमले म्हणजे ते जणू पुष्पहारातील दो-याप्रमाणे कार्यरत होते.




छत्रपती शिवाजी महाराजांसारखा एक एक मावळा गोळा करत सामाजिक बांधिलकी जपत, कोकणच्या दिलदार, सहृदयी समाजसेवेचे व्रत घेवून कोकणच्या लाल मातीत अवतरलेली आपल्या कोकणवासीयांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सदैव प्रचंड तळमळ, आत्मियता, आपुलकी स्नेहभाव ठेवून माणसांना एकत्रित आणून दैनिक युवक आधार संपादक संतोष आमले यांनी कार्यक्रम आयोजित केला. खरं तर संतोष आमले संपादक यांना कधी पदाचा ध्यास नाही पण कोकणच्या सांस्कृतिक, सामाजिक ऐक्यासाठीचा सदैव ध्यास हाच श्वास बनला होता. त्यामुळे असे भव्य दिव्य कार्यक्रम संपन्न करणे शक्य होते. कोकणच्या सामाजिक, सांस्कृतिक,ऐक्यासाठी उत्कर्षासाठी एकवटलेल्या दिवा शहरातील कोकणवासीयांनी दैनिक युवक आधार वृत्तपत्राची सुरुवात गतवर्षी सन 2023 रोजी स्थापन केली होती. मागील दोन वर्षापासून दैनिक युवक आधार या वृत्तपत्राने हळूहळू सर्वांच्या मनात व पनवेल वासियांच्या मनात एक सन्माननीय स्थान मिळवलेले आहे. दैनिक युवक आधार नववर्षाच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. 25 जानेवारी.२०२५ रोजी नील हॉस्पिटल सेक्टर एक पनवेल येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थित करण्याचे ठरले आहे तरी सदर कार्यक्रमाला आपण सर्वांनी उपस्थित राहावे ही नम्र विनंती

आपलाच विश्वासू
संतोष आमले
दैनिक युवक आधार
संपादक

# नमो चषकात खेळाडूंच्या कलागुणांना वाव;

## नमो चषकात खेळाडूंची विशेष काळजी





दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने उलवा नोडमध्ये सुरु असलेल्या 'भव्य क्रीडा महोत्सव नमो चषक २०२५' स्पर्धेला दिवसेंदिवस खेळाडू आणि क्रीडा रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत होत असलेल्या या नमो चषक क्रीडा स्पर्धेत खेळाडूंची विशेष काळजी घेण्यात आली आहे. नाश्ता, भोजन, प्रवास, प्राथमिक उपचार, आसन व्यवस्था, मदत कक्ष व इतर सुविधाही त्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या क्रीडा महोत्सवात राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा, खो-खो, कबड्डी तसेच धावणे, भाला फेक, थाळी फेक, गोळा फेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडा फेक या ॲथलेटीक्स स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सात हजारपेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग लाभला आहे. २३ जानेवारीला राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा प्रकाश झोतात मोठ्या उत्साहात पार पडली. २४ जानेवारीला प्रकाश झोतात कबड्डी स्पर्धा होत असून



२५ जानेवारीला खो-खो स्पर्धाही प्रकाश झोतात होणार आहे. तर धावणे, भाला फेक, थाळी फेक, गोळा फेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडा फेक या ॲथलेटीक्स स्पर्धा तीनही दिवस म्हणजेच २५ जानेवारीपर्यंत दिवसा होणार आहेत. एकूण तब्बल १४ लाख ९१ हजार २०० रुपयांची रक्कम आणि चषक अशा प्रकारे पारितोषिकांचे स्वरूप आहे. स्पर्धा संपन्न झाल्यानंतर त्या त्या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना बक्षिसे देऊन सन्मानित केले जात आहे. या नमो चषकामुळे खेळाडूंच्या कला गुणांना वाव मिळण्यास मोठी मदत झाली असून खेळाडू आणि क्रीडाप्रेमींकडून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, मुख्य आयोजक परेश ठाकूर आणि सहकाऱ्यांचे धन्यवाद मानले जात आहे. दर्जेदार आयोजन आणि त्याचबरोबरीने व्यवस्था उत्तम प्रकारे या ठिकाणी अधोरेखित होते. युवा खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी या ठिकाणी देशातील नामांकित क्रीडापटूंचे बॅनर लावण्यात आले असून त्यातून त्यांना प्रेरणा देणारी माहितीही यामध्ये नमूद करण्यात आली आहे. दरम्यान या सर्व क्रीडा प्रकारात होत असलेल्या स्पर्धातून अनेक सामने रोमहर्षक पहायला मिळाले आणि त्याचा क्रीडारसिकांनी मनमुराद आनंद घेतला.



## संपादकीय

# विधवा प्रथा: समाजातील क्रूरतेवर मात करणारा बदल

भारतीय समाजात अनेक पिढ्यांपासून विधवा प्रथेने स्त्रियांवर अमानुष अन्याय केला आहे. पतीच्या निधनानंतर स्त्रीच्या कपाळावरील कुंकू पुसणे, बांगड्या फोडणे, तिच्या साजशृंगारावर बंदी घालणे या प्रथांना सामाजिक स्वीकार होता. परंतु, हे केवळ प्रथा नव्हे तर स्त्रियांच्या आत्मसन्मानावर घाला होता. या अघोरी प्रथेमुळे विधवा स्त्रीला समाजात दुर्लक्षित केलं जातं, तिच्या आयुष्याला दुःखाच्या गर्तेत ढकललं जातं.

**बदलाची सुरुवात: हेरवाड गावाचा ऐतिहासिक निर्णय**
कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड हे गाव या संदर्भात प्रकाशझोतात आले. दोन वर्षांपूर्वी गावाने 'विधवा प्रथा बंद' असा ठराव पारित केला. या धाडसी निर्णयाने एक नवा आदर्श निर्माण केला. त्यानंतर वाशिम जिल्ह्यातील ढोरखेड, पिंपरी पन्हाळे यांसारख्या गावांनीही या निर्णयाचे अनुकरण केले. परिणामी, संपूर्ण महाराष्ट्रात विधवा प्रथा बंद होण्यासाठी सुरुवात झाली.

**विधवा प्रथेचे परिणाम:** विधवा प्रथा फक्त एक धार्मिक परंपरा म्हणून नव्हे, तर स्त्रीच्या मानसिक आणि सामाजिक स्थितीवर खोल परिणाम करणारी व्यवस्था होती. पतीच्या निधनानंतर साजशृंगार काढणे आणि समाजाकडून तिला वेगळं वागणूक मिळणे हा तिचा अपमान आहे. ज्या स्त्रीने संसाराच्या प्रत्येक टप्प्यात साथ दिली, तिच्यावरच समाजाने हे अन्यायाचे बंधन लादले.

**कुंकवाचा महत्त्व:** भारतीय परंपरेनुसार स्त्रीच्या कपाळावर कुंकू लावण्याचा अर्थ तिच्या आरोग्यासाठी सकारात्मक ऊर्जा देणे. परंतु, पतीच्या मृत्यूनंतर तिच्या कुंकवाला संपवणे म्हणजे तिच्या आरोग्याचा आणि आत्मसन्मानाचा अनादर करणं होय.

**समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज**
आजच्या काळात समाजाला स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. विधवा स्त्रीला दुःखातून सावरण्याचा आणि नवे आयुष्य उभारण्याचा अधिकार आहे. तिला समानतेची वागणूक देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. समाजाने तिच्या दुःखात कुरबुर न करता तिला आनंदाने जगण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे.

**स्त्रीचा स्वाभिमान: प्रेरणा देणाऱ्या स्त्रिया**
इतिहासात अनेक महान स्त्रिया आहेत ज्या पतीच्या निधनानंतरही सशक्तपणे उभ्या राहिल्या. सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी समाजात स्वाभिमानाने आपले स्थान निर्माण केले. त्यांनी स्त्रियांसाठी आदर्श घालून दिला की, 'पतीच्या मृत्यूनंतरही जीवन संपत नाही, ते एका नव्या प्रवासाला सुरुवात होते.'

**विधवांचे आत्मभान:** विधवांनी स्वतःला दुःखात अडकवून न ठेवता आत्मविश्वासाने आयुष्याला सामोरे जाणे गरजेचे आहे. पतीच्या आठवणी जपूनही, तिचा साजशृंगार आणि स्वाभिमान अबाधित ठेवणे हा तिचा अधिकार आहे. समाजाने यासाठी तिला प्रोत्साहित करणे गरजेचे आहे.

**बदलासाठी नवीन पिढीचा दृष्टिकोन**
आजची पिढी या बदलाचे नेतृत्व करू शकते. मुलगी, सून, बहीण, भावजय यापैकी कोणीही या स्थितीत असू शकते. त्यांच्या आत्मसन्मानासाठी समाजाने सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारायला हवा.

विधवा प्रथेच्या क्रूरतेला झुगारून स्त्रीला तिच्या स्वाभिमानाने उभे राहण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे. स्त्रियांनीही सावित्रीबाई आणि झाशीची राणी यांच्यापासून प्रेरणा घेऊन स्वाभिमानाने आयुष्य जगावे. समाजातील या बदलामुळे स्त्रियांना न्याय मिळेल आणि समानतेचे नवे पर्व सुरू होईल.

**जय सावित्री ! जय स्त्रीशक्ती !**

# महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेलचे विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: युवकांचा ध्यास, शाश्वत ग्राम विकास या संकल्पासह महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेलच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 13 ते 19 जानेवारी दरम्यान दत्तक गाव रीटघर, पनवेल व निवास स्थान शांतीवन, नेरे, पनवेल याठिकाणी सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे १३ जानेवारी रोजी उद्घाटन झाले. विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी रीटघर गावात बंधारा बांधला, शाळेजवळील व गावातील परिसर स्वच्छ केला. गावामध्ये मतदान व स्वच्छतेविषयी रॅली च्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. या शिबिराच्या बौद्धिक सत्रात प्रा. जगदिश संसारे यांचे पथनाट्य प्रशिक्षण, राजू मुंबईकर यांचे सर्प विज्ञान, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडिक यांचे वाहतुकीचे नियम, आनंद नागरे यांचे सोशल मिडिया: युवकांपुढील आव्हाने







व संधी, प्रा. सुनील देवरे यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्व विकास, अड. प्रमोद ठाकूर यांचे समता, न्याय आणि स्वातंत्र्य: भारतीय राज्यघटनेचे नैतिक आधारस्तंभ, हर्षल सोनावळे यांचे आपत्ती व्यवस्थापन, तेजल खेडेकर यांचे व्यसनमुक्ती विषयावर व्याख्याने झाली. या शिबिरात विद्यार्थ्यांनी प्रार्थना, योग, कवायत, शिस्त, संस्कार व सामाजिक बांधिलकीचे धडे घेतले. या शिबीराचा समारोप समारंभ 19 जानेवारी 2025 रोजी आयोजित करण्यात आला होता. या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय अधिकारी, रायगड विभाग, रयत शिक्षण संस्था, सातारा एम.के. कोंगेरे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना आपल्या जुन्या आठवणीना उजाळा दिला आणि आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास हा राष्ट्रीय सेवा योजनाच्या विविध उपक्रमाच्या द्वारे होतो तसेच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण ही शिबीरा मधुन विकसित होतात असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले. अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकुर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले व या शिबिरातुन युवकांनमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते तसेच भावी जीवनात आव्हानांना सामोरे जातांना या शिबिराचा निश्चितच फायदा होईल असा विश्वास त्यांनी या प्रसंगी व्यक्त केला. ज्या स्वयंसेवकांनी शिबिरात उत्कृष्ट कार्य केले त्यांचे मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून गौरविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी वैभव जगझाप यांनी उपस्थितांसमोर सात दिवसांचा आढावा घेतला. कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन, नेरेचे कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर, कार्यवाहक नीलकंठ कोळी आदींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी हेमंत कनोजा यांनी केले. सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपश्री कडु यांनी केले

# मुंबई उपनगरच्या उमेश गुप्ताने पटकावला राज्यस्तरीय शरीरसौष्ठव 'नमो चषक २०२५ किताब'

**पान १ वरुन** निलेश रेमजे (मुंबई), पाचवा क्रमांक अभिषेक लोंढे (मुंबई) तर सहावा क्रमांक जीवन सकपाळ(मुंबई ), तर ८५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक विशाल सुरवसे (पुणे), द्वितीय क्रमांक संदेश सामंत (सिंधुदुर्ग), तृतीय क्रमांक सुखदीप सिंग (रायगड), चतुर्थ क्रमांक अर्जुन शर्मा (ठाणे), पाचवा क्रमांक महेंद्र पाचपुते (पुणे) तर सहावा क्रमांक ऋत्विक जाधव (पुणे) याने पटकावले. ८० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक सागर कातुर्डे (मुंबई), द्वितीय क्रमांक कमलेश अंबारा (पुणे), तृतीय क्रमांक संजय प्रजापती (मुंबई), चतुर्थ क्रमांक अक्षय शिंदे (पुणे ), पाचवा क्रमांक प्रभाकर पाटील (रायगड) तर सहावा क्रमांक सचिन हगवणे (पुणे) , ७५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक भगवान बोराडे (मुंबई उपनगर), द्वितीय क्रमांक आकाश दडमल (पुणे), तृतीय क्रमांक उदय देवरे (रायगड), चतुर्थ क्रमांक विशाल धावडे (उपनगर), पाचवा क्रमांक मंगेश भोसले (पश्चिम ठाणे) तर सहावा क्रमांक अक्षय शिंदे (पुणे), ७० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक उमेश गुप्ता(उपनगर), द्वितीय क्रमांक स्वप्नील नरवडकर (इंडियन नेव्ही), तृतीय क्रमांक संकेत भरम (उपनगर), चतुर्थ क्रमांक दीपक राऊळ (रायगड), पाचवा क्रमांक प्रशांत पोराळे (पुणे) तर सहावा क्रमांक रोशन दळवी (कोल्हापूर ), ६५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक उद्देश ठाकूर (रायगड), द्वितीय क्रमांक नरेंद्र व्हालेकर (पुणे), तृतीय क्रमांक संदीप सावळे (उपनगर ), चतुर्थ क्रमांक सचिन सावंत (पुणे ), पाचवा क्रमांक निलेश धोंडे (पुणे) तर सहावा क्रमांक सचिन बोईनवाड (पश्चिम ठाणे), ६० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक बाळू काटे (पुणे), द्वितीय क्रमांक गणेश पाटील (रायगड), तृतीय क्रमांक जितेश मोरे (मुंबई), चतुर्थ क्रमांक जुगल शिवणे (रायगड), पाचवा क्रमांक सुयश सावंत (उपनगर) तर सहावा क्रमांक अमोल वायल (पुणे), ५५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक हनुमान भगत (रायगड), द्वितीय क्रमांक राजेश तारबे (मुंबई), तृतीय क्रमांक अजय ओजरकर (पुणे), चतुर्थ क्रमांक संजय भोपी (रायगड), पाचवा क्रमांक दीपक कांबळे (पुणे) तर सहावा क्रमांक संदेश भोईर (रायगड), १७१ सेंटीमीटर वरील गटात प्रथम क्रमांक बॉबी पाटील (रायगड), द्वितीय क्रमांक राजेश सिंग (पालघर), तृतीय क्रमांक शुभम पवार (पुणे), चतुर्थ क्रमांक मयूर शिंदे (नाशिक), पाचवा क्रमांक रोहन ठाकूर (रायगड) तर सहावा क्रमांक अक्षय शिंदे (पुणे), १७१ सेंटीमीटर खालील गटात प्रथम क्रमांक रोहन वाणी (रायगड), द्वितीय क्रमांक नरेंद्र वाल्हेकर (पुणे), तृतीय क्रमांक अनिकेत पाटील (रायगड), चतुर्थ क्रमांक निलेश गुरव (उपनगर), पाचवा क्रमांक सचिन बोईनवाड (पश्चिम ठाणे) तर सहावा क्रमांक कौस्तुभ पाटील (रायगड), मास्टर ४० प्लस गटात प्रथम क्रमांक रवींद्र माने (इंडियन नेव्ही), द्वितीय क्रमांक कुमाम कोईरेम्बा (ठाणे), तृतीय क्रमांक दीपक राऊळ (रायगड), चतुर्थ क्रमांक स्वप्नील अशाइत (पालघर), पाचवा क्रमांक चिराग पाटील (पालघर) तर सहावा क्रमांक जयप्रकाश नार्वेकर (सिंधुदुर्ग) याने पटकावला. या सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

**- स्पर्धा बक्षिस स्वरूप -**
'किताब विजेता' - ०१ लाख ११ हजार रुपये
उपविजेता - ५१ हजार रुपये
तृतीय क्रमांक - २१ हजार रुपये
बेस्ट पोझर - ११ हजार रुपये
सांघिक विजेता - ११ हजार रुपये
सांघिक उपविजेता - ०८ हजार रुपये
सांघिक तृतीय क्रमांक - ०६ हजार रुपये
सांघिक चतुर्थ क्रमांक - ०५ हजार रुपये
सांघिक पाचवा क्रमांक - ०४ हजार रुपये
८५, ८०, ७५, ७०, ६५, ६०, ५५ किलो वजनाखालील गट, ८५ किलो वरील गट, १७१ सेंटीमीटर खालील व १७१ सेंटीमीटर वरील, आणि मास्टर ४० प्लस या प्रत्येक गटातील अनुक्रमे प्रथम क्रमांकास १५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १२ हजार रुपये, तृतीय क्रमांकास ०८ हजार रुपये, चतुर्थ क्रमांकास ०६ हजार रुपये, पाचव्या क्रमांकाला ०४ हजार रुपये तर सहाव्या क्रमांकाला ०३ हजार रुपये रक्कम बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.

# माणुसकी फाऊंडेशनचे काम वाखाणण्याजोगे –माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**
**पत्रकारिता हे दुधारी शस्त्र; पत्रकार ही अतुलनीय शक्ती - माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ**

**निफाड,-** माणुसकी फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम वर्षभर राबविण्यात येतात. माणुसकी हे नाव त्यांनी सार्थ केले असून माणुसकी फाऊंडेशनचे काम वाखाणण्याजोगे असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून माणुसकी फाऊंडेशनचे अध्यक्ष पत्रकार सागर निकाळे यांनी आयोजित केलेला पत्रकार गुणगौरव सोहळा हॉटेल गुलमोहर येथे पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते शिवाजीराव ढेपले,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, डॉ.श्रीकांत आवारे, भाऊसाहेब बोचरे, विनोद जोशी अण्णासाहेब बोरगुडे, आनंद




जाधव, केशव जाधव माणिक देसाई .युवक काँग्रेसचे सचिन खडताळे यांच्यासह निफाड पंचायत समितीचे सहायक गटविकास अधिकारी सुनील पाटील आणि तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते. स्व.बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती व छत्रपती शहाजीराजे भोसले यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले की, महाराष्ट्रात पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू करण्याचा मान जातो तो श्री. बाळशास्त्री जांभेकर यांना जातो. मराठी झुंजार पत्राकारितेची परंपरा चिपळूणकर बंधू, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, लोकहितवादी, बापूजी अणे, माडखोलकर, शिवराम परांजपे, न. चिं. केळकर, कोल्हटकर, मामा वरेरकर, भोपटकर, अनंत गद्रे, खाडिलकर, परुळेकर इत्यादींनी पुढे नेली. ही सर्व मंडळी आपापल्यापरीने स्वदेश, समाजजागृती, सामाजिक सुधारणा यांकरता वृत्तपत्राच्या माध्यमातून कार्यरत होती. बाबासाहेबांचा ‘मूकनायक’ किंवा ‘बहिष्कृत भारत’, टिळकांचा ‘केसरी’, मराठी भाषेत नसला तरी ‘हरिजन’ आणि ‘यंग इंडिया’ ही महात्माजींची वृत्तपत्रे एका धोरणाभोवतीच सर्वस्व पणाला लावून काम करत होती. महात्मा फुले यांनी सहकार्याच्या माध्यमातून दीनबंधू हे वर्तमान पत्र सुरू केले. मराठी पत्रकारितेचे हे प्रभावी कूळ आहे. त्यात रामभाऊ मंडलिक (कुलाबा समाचार), भाऊसाहेब माडखोलकर (तरुण भारत), रा. ग. जाधव (पुढारी), औरंगाबादचे अनंत भालेराव (मराठवाडा), सोलापूरचे रंगा वैद्य (संचार), बाबूराव जक्कल (सोलापूर समाचार), अमरावतीचे बाळासाहेब मराठे (हिंदुस्थान), दादासाहेब पोतनीस (गावकरी), वालचंद कोठारी (पुणे), ब्रिजलाल पाटील (जळगाव), गोविंद तळवलकर, माधव गडकरी अशी नावे जेव्हा सहजपणे समोर येतात तेव्हा जाणवते की, मराठी पत्रकारितेत एक दरारा होता, धाक होता, चारित्र्य होते. पुरोगामी विचारांचा संदेश घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात एक लोकविलक्षण क्रांती घडवली. डॉ.आंबेडकरांच्या लेखणीने उपेक्षित, पददलित, विस्थापित सामान्यजनांचे दुःख 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', आणि 'समता' यांसारख्या नियतकालिकांतून मांडले असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, समाजात जिथे अन्याय होत असेल तिथे वाचा फोडण्याचे कार्य पत्रकार करत असतात. वर्तमान पत्र ही समाजाचा आरसा आहे. सध्या पत्रकारितेत स्पर्धा अतिशय वाढली असून टीआरपीसाठी सकारात्मक बातम्यांपेक्षा नकारात्मक बातम्यांना अधिक प्रसिद्धी दिली जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच पत्रकारिता हे अतिशय मोठे शस्त्र आहे. हे दुधारी शस्त्र असून चांगल्या कामासाठी या शस्त्राचा वापर करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, मराठी पत्रकारितेला मोठा इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर ज्या ज्या वेळी समाजावर अन्याय होत होता. तेव्हा आपली सामाजिक जबाबदारी म्हणून पत्रकारांनी आपले कार्य केले आहे. पत्रकारितेचा हा इतिहास नवीन पत्रकारांच्या पिढीला पत्रकारिता क्षेत्रात धैर्याने काम करण्याची प्रेरणा देतात. लोकशाहीचा चौथा खांब म्हणून पत्रकारितेकडे बघितले जाते. त्यामुळे लोकशाही मजबूत करण्यास पत्रकारितेचे योगदान अतिशय महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# पत्रकारांना धमकी दिल्यास ५० हजार दंड व ३ वर्ष तुरुंगवास

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

पत्रकारांना धमकी दिल्यास ५० हजार दंड व ३ वर्ष तुरुंगवास.. हायकोर्टाच्या टिकेनंतर पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनीही जाहीर केले आहे की, पत्रकारांशी असभ्य वर्तन करणाऱ्यांना ५०, हजारांचा दंड आणि पत्रकारांशी गैरवर्तन करणाऱ्याला ३ वर्षांचा तुरुंगवास होऊ शकतो, पत्रकाराला धमकी देणाऱ्याना आतमध्ये तुरुंगात पाठवण्यात येईल पत्रकारांना धमकावल्या प्रकरणी अटक करण्यात आलेल्यांना सहजासहजी जामीन मिळणार नाही. सीएम म्हणाले की पत्रकार अडचणीत आल्यास त्वरित त्यांच्याशी संपर्क साधा आणि मदत करा आणि पत्रकारांशी आदराने बोला. नाहीतर तुम्हाला मोठी किंमत मोजावी लागते. गैरवर्तन करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर एफआयआर नोंदवला जाईल, अन्यथा एसपीवर कारवाई केली जाईल पत्रकार जमावाचा भाग नाहीत. ही बाब लक्षात घेऊन प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मार्कंडेय काटजू यांनी राज्य सरकारांना ताकीद दिली असून पत्रकारांशी गैरवर्तन करू नये,अशा सूचना दिल्या आहेत पोलिस किंवा अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल काटजू म्हणाले "जसा एखादा वकील आपल्या अशिलाच्या हत्येचा खटला न्यायालयात लढतो, तसा तो खुनी होत नाही तसेच पत्रकार त्यांचे काम सार्वजनिक ठिकाणी करतात पण ते गर्दीचा भाग नसतात त्यामुळे पत्रकारांना त्यांच्या कामापासून रोखणे हे माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे. यासंदर्भात प्रेस कौन्सिलने देशाचे कॅबिनेट सचिव, गृह सचिव, मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि सर्व राज्यांच्या गृह सचिवांना सुचना पाठवल्या असून पत्रकारांसोबत पोलिस किंवा निमलष्करी दलांकडून होणारा हिंसाचार खपवून घेतला जाणार नाही. असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे पत्रकारांवर असे कोणतेही कृत्य होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी. पत्रकारांसोबत पोलिसांनी केलेल्या हिंसाचार हा प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन मानला जाईल, जो घटनेच्या कलम १९ए मध्ये देण्यात आला आहे आणि घटनेच्या या कलमानुसार गैरवर्तन करणाऱ्या पोलीस किंवा अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.



# चित्तेगांव येथे शिवमहापुराण कथेचे आयोजन




**प्रतिनिधी - श्री.रमेश सुरशे**
**छत्रपती संभाजीनगर**

पैठण तालुक्यातील चित्तेगांव येथे मागील चार वर्षापासून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात येते,यावर्षी या भव्य सोहळ्याचे ४थे वर्ष असून दि.२३ जानेवारी ते ३०जानेवारी पर्यंत हा सोहळा आयोजीत केला आहे. या सोहळ्याच्या प्रथम दिवशी श्री.हरिहरानंद भारती स्वामीजी यांची चितेगाव येथे भव्य शोभा यात्रा काढण्यात आली होती. याप्रसंगी गजराज हत्तीवरून स्वामीजीची मिरवणूक काढून त्यांच्यावर जेसीबीच्या साहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली. स्वामीजी बरोबरच आघोरी बाबांची ही मिरवणूक काढण्यात आली. हा सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. यावेळी चितेगांव व परिसरातील भाविक मोठया संख्येने उपस्थित होते. या शिवमहापुराण कथेस ग्रामस्थानी व परिसरातील भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समस्त शिवभक्त चित्तेगांव यांनी केले आहे.

**प्रतिनिधी - श्री.रमेश सुरशे छत्रपती संभाजीनगर**

# भागोजीशेठ कोण आणि त्यांचे महत्व काय ?

## पतितपावन म्हणजे...

दैनिक युवक आधार
वार्ताहर

महाराष्ट्रीय कोकणपुत्र स्वातंत्र्यसेनानी हिंदू समाजसेवक दानशूर- भागोजीशेठ कीर हे महामानव एक हिंदूचे दैवत आहेत! त्यांच्या पवित्र अन् महान कार्याचे हिंदू पाईक आहेत..... भागोजीशेठ यांनी स्वातंत्रवीर सावरकर यांच्या अनेक कार्याला सतत मुल्य रूपाने रसद पुरवली होती.... सावरकरांच्या इच्छापुर्तीसाठी भागोजीशेठ कीर यांनी त्यांना रत्नागिरी जिल्हाल्यातील एका मोक्याच्या ठिकाणी स्वतः जागा विकत घेऊन त्या जागी एक छानशे पतितपावन मंदिर स्वखर्चाने बांधून दिले! असे लिखित संदर्भ असताना बालभारती संशोधन मंडळाने निरपेक्ष दानशूर भागोजीशेठ किर यांचे नाव कसे काय वगळले गेले? रत्नागिरी तालुका भंडारी समाज मंडळाने ह्या संदर्भात अगदी परखड भूमिका घेतली आहे या बद्दल सर्व पदाधिकारी आणि समस्त रत्नागिरीचे भंडारी समाज बंधू लाखोंच्या संख्येने एकवटले आहेत त्याचे पडसाद २६ जानेवारी २०२५ रोजी रत्नागिरी जिल्हा कलेक्टर आणि संपूर्ण शहरात निषेधार्थ मोर्चे बांधणी केली जाणार आहे! यासाठी मुंबईतून आणि ठिकाणाहून कोकणी बंधू भगिनीं गुरूवार दिनांक -२३ जानेवारी २०२५ पासूनच रत्नागिरीला जाण्यासाठी तयारीला लागले सुध्दा ! भंडारी समाजाचे शिवआरमाराचे पहिले नौदल प्रमुख मायनाक भंडारी आणि देशात, दानाचे कार्य करणारे महाराष्ट्रीय स्वतंत्रसेनानी कोकणातील भूमिपुत्र- भागोजीशेठ यांनी दादर येथे छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे हिंदू स्मशान भूमीसाठी ९ एकर जमीन, तत्काळीन बाजार भावाने विकत घेऊन सरकारला दान करणारे एकमेव दानशूर व्यक्ती आणि देश कार्यासाठी स्वा.



सावरकरांचे विनंती वरून विविध कार्यात मदत करणारे भागोजीशेठ हेच होते! तरी ही त्यांना उघडपणे कोणते ही श्रेय देण्यात आलेले नाही ! या संदर्भात मुंबईसह समस्त कोकणातील भंडारी समाजाने आणि हिंदू बांधवांनी जोरदार समर्थन दिले आहे! श्रीमान भागोजीशेठ कीर यांचा महान इतिहास जाणीवपूर्वक पाठ्यपुस्तकांतून पुसण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येत आहे! आणि म्हणूनच भंडारी व पर्यायाने सर्व हिंदू समाज संघटनांनी या कार्यात सहभागी होवून लक्षणीय उपोषणाचा इशारा दिला आहे या निमित्ताने २२ जानेवारी २० २५ रोजी पतितपावन मंदिरात बहुसंख्य लोकांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी "भारतीय मजदूर संघ" च्या संघटनमंत्री - संजना वाडकर यांनी "भागोजीशेठ" यांचे दैदिप्यमान सुकार्य मराठ्यांच्या इतिहासातील महत्त्व पुसले जावू नये म्हणून उपोषणाला पाठिंबा जाहीर केला आहे असे राजीव कीर आणि भागोजीशेठ अनुयायांनी पतितपावन मंदिरातच उपोषणाचा इशारा जाहीर केला.... या उपोषणात- संत रोहिदास समाजाचे - विजयशेठ खेडेकर, तेली समाजाचे जिल्हाध्यक्ष- रघुवीर शेलार, पांचाळ- सुतार समाजाचे अध्यक्ष- भगवान सुतार, कटबु समाजाचे अध्यक्ष- बी. टी. मोरे, अण्णा लिमये, निवृत्त डीवायएसपी- विलास भोसले, सुरेंद्र घुडे, मंगेश शिरधनकर, म. दा. मोरे, अन्ड. सौ. प्रज्ञा तिवरेकर, चंद्रहास विलणकर, मुकुंद विलणकर, राजेंद्र विलणकर, नितीन तळेकर, बाबू धामणस्कर, संजना वाडकर, सौ. राखी भोळे, सौ. दया चवंडे, सौ. वारेकर ताई, सौ. ज्योती तोडणकर, सौ. सावली मयेकर, सौ. आदिती भाटकर, कौस्तुभ नागवेकर, परिस पाटील, दिलीप रेडकर, सिध्देश सुर्वे, श्रेयस कीर, सदानंद मयेकर, "बाळगंगा पडवणे श्रमसंघ" चे कार्यकर्ते आदी मोठ्या लोकसंख्येच्या उपस्थितीत उपोषणाचा दिवस २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिनी सकाळी जिल्हा कलेक्टर कचेरी समोर...

-------

**सु. बा. सरपडवळ**

# पशू वैद्यकीय दवाखाना डॉक्टर विना पोरका; कायम स्वरूपी डॉक्टर व कर्मचारी नियुक्तीची मागणी




**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

गवळ आळीमध्ये असलेला पशू वैद्यकीय दवाखाना गेली अनेक वर्षे डॉक्टर विना पोरका झाला असून या ठिकाणी कायम स्वरूपी डॉक्टर व कर्मचारी यांची नियुक्ती करण्याची मागणी नागोठणे विभागातील नागरिक करीत आहेत. सदरील दवाखान्यात गेली अनेक वर्षे कोणताही डॉक्टर कायम स्वरूपी कार्यरत नाही. सदर दवाखान्यावर नागोठणे शहरासह विभागातील नागोठणे,कोंडगाव,पळस,कडसुरे, वणी,पिंगोडे,वरवठणे,वांगणी,पाटणसई व ऐनघर या ग्रामपंचायती मधील एकुण 32 खेडेगावे व आदिवासी वाड्या अवलंबून आहेत. या सर्व विभागात साधारण एकुण 10 ते 12 हजार पशुधन आहे.त्यामध्ये नागोठणे येथे साधारण 4000 ते 4500 पशुधन असल्याने याठिकाणी कायम स्वरूपी डॉक्टर व कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. सदरील दवाखान्यात एक डॉक्टर, वृणोपचारक व एक शिपाई असे तीन कर्मचारी ही पदे आहेत.परंतु प्रत्यक्षात कोणतेही डॉक्टर किंवा मदतनीस व एकही कर्मचारी उपलब्ध नाहीत. जे कोणी येतात त्यांची दोन तीन महिन्याने बदली होत असते. त्यामुळे दवाखाना सतत बंद असल्याचे दिसत आहे. तसेच कोणते डॉक्टर कोणत्या दिवशी उपलब्ध आहेत ? मदतनीस कोण आहेत ? त्यांचे नाव व मोबाइल नंबर त्यांची येण्या जाण्याची वेळ दवाखान्याच्या बाहेर कुठेही लिहिलेला दिसत नाहीत. त्यामुळे आपल्या प्राण्यांना घेऊन आलेल्या व्यक्तींना मनस्ताप सहन करावा लागतो. यापूर्वी दवाखान्यात डॉक्टर नसल्याने गेली अनेक वर्षांचा पशू वैद्यकीय अनुभव असलेले तसेच दवाखान्यात एकमेव असलेले नामदेव जाधव नामक कर्मचारी शेतकऱ्यांच्या आग्रहा खातर डॉक्टरची भूमिका बजावत होते. व विभागातील जनावरांची सर्वोतोपरी काळजी घेत होते. परंतु सदरील जाधव यांची दोन तीन वर्षापूर्वी बदली झाल्याने दवाखान्यात दूसरा कोणीही कर्मचारी नसल्याने दवाखाना बंद ठेवावा लागत आहे. या दवाखान्यात संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून लवकरात लवकर कायम स्वरूपी डॉक्टर व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरावीत तसेच नामदेव जाधव सारखा कर्मचारी सदरील दवाखान्यात कार्यरत व्हावा अशी मागणी विभागातील नागरिकांसह शेतकरी वर्ग करीत आहेत.

# खालापूर पंचायत समिती कार्यालय येथे पुस्तक लायब्ररी

**सहजसेवेची खालापूर तालुक्यातील चौथी लायब्ररी**



**दैनिक युवक आधार**
**खालापूर:- वार्ताहर**

सहजसेवा फाउंडेशन समाजासाठी नाना विविध सातत्यपूर्ण उपक्रम राबवीत असते.समाजाची गरज ओळखुन सामाजीक उपक्रम करणे ही संस्थेची ओळख आहे. खालापूर तालुक्यात पंचायत समिती कार्यालय येथे शासकीय कामासाठी समाजातील विविध स्तर येत असतात.कामानिमित्त काही वेळ थांबणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचनात सार्थक ठरावा यासाठी सहजसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून पंचायत समिती कार्यालयात विविध प्रकारची पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचा शुक्रवार दिनांक 24 जानेवारी 2025 रोजी खालापूर तालुक्याचे गट विकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. खालापूर तालुक्याचे गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी शुभारंभाचा श्रीफळ वाढविला.यावेळी पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहजसेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे, उपाध्यक्षा इशिका शेलार,खजिनदार संतोष गायकर,सचिव अखिलेश पाटील सह खजिनदार बनिता सहा,महीला संघटक निलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, मार्गदर्शक नरेंद्र हर्डीकर,खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार,सुरज पाटील, सागरिका जांभळे यांनी अथक परिश्रम घेतले. पत्रकार विकी भालेराव व साबीर शेख उपस्थित होते. सहज लायब्ररीचा पंचायत समिती कार्यालय येथे येणाऱ्या जनतेसाठी नक्कीच उपयोग होइल आणि कार्यालयातील वातावरण वैचारिक राहण्यास मदत होईल तसेच जिल्हाधिकारी यांच्यामार्फत येणारे मासिक सुध्दा यात समाविष्ट होवून ज्ञानात नक्कीच भर पडेल असा आशावाद खालापूरचे गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी व्यक्त केला.

# विजय बाबा वाकोडे व सोमनाथ सुर्यवंशी यांचं बलिदान व्यर्थ नाही जाऊ देणार.. सुधीर साळवे

**दैनिक युवक आधार**
**जालना (अशोक ठोके)**

17 जानेवारी 2025 रोजी विजय बाबा वाकोडे यांचे सुपुत्र आशिष वाकोडे व अविनाश सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात परभणी ते मुंबई पर्यंत निघालेला लॉंग मार्च आज जालना जिल्ह्यातील नागेवाडी येथे येऊन ठेपला आहे,या लॉंग मार्च मध्ये सामील झालेल्या आंबेडकरी समाजाला तसेच शहीद विजय बाबा वाकोडे, सोमनाथ सूर्यवंशी व स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना तसेच आंबेडकरी समाजाला जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्त बसणार नाही, आज जरी मी चक्कर आल्यामुळे रुग्णालयात दाखल असलो तरी मी लवकरच बरा होऊन लॉंग मार्च मध्ये सामील होणार आहे,असे प्रतिपादन सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष सुधीर भाऊ साळवे यांनी केले आहे. आम्हाला न्याय द्या नाहीतर आमचा जीव घ्या अशी मागणी लॉंग मार्च मधील आंबेडकरी समाजाने महाराष्ट्र सरकारकडे केली आहे.या लॉंग मार्चचे प्रमुख मार्गदर्शक समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे, डॉ. सिद्धार्थ भालेराव, प्रकाश कांबळे, रवि सोनकांबळे, सिद्धार्थ भराडे हे आहेत. पक्ष व जात-पात न पाहता केवळ अन्यायावर आघात करण्यासाठी, अन्याय हा अन्याय असतो तो कोणावरही होऊ शकतो आज वेळ परभणीकरांवर आहे उद्या वेळ सर्वांवर येऊ शकते त्यामुळे या लॉंग मार्चमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.शहिद विजय वाकोडे, शहीद सोमनाथ सुर्यवंशी व स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण लाखोंच्या संख्येने या लॉन्गमार्च मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन लॉंग मार्च मधील आंबेडकरी समाजाने केले आहे.या लॉंग मार्चचे संयोजन सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष सुधीर साळवे, प्रदिप वाव्हळे, सचिन पचपुंजे, संजय मकरंद, विश्वजित वाघमारे, अर्जुन पंडीत,संजय खिल्लारे, महेंद्र गाडे, भिमराव पंतगे, गौतम धबाले, अविनाश आंभोरे, राहुल मकरंद, शेषराव जल्लारे, भगवान जगताप, सखाराम टेकुळे, पवन सिंदे, शशिकांत हत्तीअंबीरे, धम्मदिप रोडे, चंद्रकांत लहाणे, बिंदु दातार, हरीष पंडीत, गणेश भालेराव, सम्राट पंचागे, लेखन जामकर, चंद्रकांत जोंधळे, धम्मदिप मोगले, अमोल वाघमारे, कचरू गोडबोले, सुरेश काळे, मिलिंद बामणीकर, राहुल घनसावत, सतिष भिसे, नवनाथ पैठणे, करूण नागरे, माणिक डाले, बाबासाहेब भरादे,संजीवणी भराडे, अनिता लहाने, प्रेमलता साळवे, निर्मल कसारे, माया लहाणे, वर्षा शिरसाट,सुमन भराडे, कांता भराडे, पंचफुला कांबळे, शिलाताई डोळसे, सुनिता कनकुने, त्रीशला जाधव, सुमन नरवाडे, कमलबाई मोरे व सर्व आंबेडकरी बांधव व भगिनीनी या लॉंग मार्च चे संयोजन केले आहे. या लॉंग मार्चला परतूर मंठा विधानसभेची वंचित बहुजन आघाडीचे भावी आमदार रामप्रसाद थोरात सर यांनी भेट देऊन आम्ही सर्व तुमच्या पाठीशी





आहोत असे लॉन्ग मार्चमधील आंबेडकरी समाजाला त्यांनी सांगितले आहे.

# ५२ रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनाचे रायगड जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाके यांच्या हस्ते उद्घघाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद अलिबाग ' शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग, रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळ व सु. ए. सो. के. आ. बांठिया माध्यमिक विद्यालय व एन. एन. पालीवाला क. महाविद्यालय नविन पनवेल आयोजित करण्यात आले होते . ५२ रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे यांच्या अध्यक्षतेखाली १६ जानेवारी रोजी उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिता चांदोकर उपशिक्षणाधिकारी यांनी केले. या विज्ञान प्रदर्शनात ६ वी ते ८ वी गटातील ४५ प्रकल्प ९ ते १२ गट ४५ प्रकल्प, आदिवासी व दिव्यांग गटातील ९ प्रकल्प एकूण ९९ प्रकल्प मांडण्यात आले. प्राथमिक शिक्षक गटातून १५ प्रकल्प, माध्यमिक शिक्षक गटातून १५ प्रकल्प, प्रयोगशाळा परिचर




१० प्रकल्प असे एकूण ४० प्रकल्प सादर करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात २६० विद्यार्थ्यांनी आणि १०० शिक्षकांनी सहभाग घेतला होता. महारुद्र शाळेत शिक्षणाधिकारी यांनी आपल्या भाषणातून बालवैज्ञानिकांना संबोधित करताना म्हटले आपल्याकडे आत्मविश्वास असेल तर आपण अशक्य गोष्ट शक्य करू शकतो. या विषयावर बोलताना विविध वैज्ञानिक व तत्त्ववेक्ताची उदाहरणे दिली. राजेंद्र पालवे प्राचार्य यांनी भावी वैज्ञानिकांनी मार्गदर्शन करताना जिज्ञासा असेल तर आपण नवनवीन शोध लावू शकतो. बदलत्या जीवनशैलीमुळे विज्ञानाने प्रगती केली आहे आणि डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम हे बाल शास्त्रज्ञ होते म्हणून बालकांच्या वैज्ञानिक ज्ञानाला वाव देण्यासाठी व त्यांना प्रेरणा मिळवण्यासाठी आशा विज्ञान प्रदर्शनांची गरज आहे असे मत प्राचार्य बी एस माळी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे मंगळयान प्रतिकृतीचे मान्यवरांनी रिमोट कंट्रोल साहाय्याने उद्घाटन करण्यात आले. मंगळयान प्रतिकृती निर्माण करणारे पर्यवेक्षक बी.यू. महाजन आणि सहकारी शिक्षकांचे या प्रसंगी विशेष कौतुक करण्यात आले. पनवेल पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहीते, आदी मान्यवर उपस्थित होते. सदर विज्ञान प्रदर्शनात १६ , १७ जानेवारी दोन दिवस चालले.या विज्ञान प्रदर्शनात राज्यस्तरीय ६वी ते ८ वी गट अर्णवी गावंड प्रथम क्रमांक (सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट) के एस इंग्लिश मिडीयम स्कूल कर्जत क्रिश गणेश सावंत एल ए. इ एस. इंग्लिश मिडीयम स्कूल नेरळ ( लाडकी प्रकल्प) विशाल सावंत लोकनेते दि.बा. पाटिल विद्यालय कामोठे (कॉलिंग हेल्मेट) तृतीय क्रमांक आदीवासी गट-अंजली वाघ रा. जि. पण. शाळा झुगरेवाडी कर्जत (रस्ते सुरक्षा ) प्रथम क्रमांक दिव्यांग गट सृष्टी खिलारे अशोकादा साबळे माणगाव कुच-याचे विजेत रुपांतर प्रथम क्रमांक तर ९ ते १२ वी गटात तन्वी बुंदे एल ए इ एस इंग्लिश मिडीयम स्कूल नेरळ (प्रवाशी प्रकल्प) प्रथम क्रमांक अम्माद कोडविलकर ए के आय उर्दु गोरेगाव व्हाक्युम ट्रेन) द्वितीय क्रमांक केदार तुपे पेण प्रायव्हेट हायस्कूल पेण (मिनी इन्व्हटर) तृतीय क्रमांक आदीवासी गट गौरव आवटी भाऊसाहेब राऊत विद्यामंदीर कशेळे (स्मार्ट होम) प्रथम क्रमांक दिव्यांग गटात साईराज लाड लोकमान्य ज्ञानदीप विद्यामंदिर साई माणगाव ( टाकाऊ पासून टिकाऊ) या विज्ञान प्रकल्प प्रथम क्रमांक पटकावला.या विद्यार्थ्यांची निवड राज्य स्तरीय विज्ञान प्रदर्शनात झाली आहे. प्रदर्शनाच्या आयोजनात के. आ. बांठीया व एन.एन. पालीवाला क. महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी प्रयत्न केले.

# लेंडी धरणाच्या संदर्भात नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र चव्हाण यांनी तेलंगणा राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांची घेतली भेट




**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**

चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रकल्प धरणाच्या विकासासंदर्भात महाराष्ट्र राज्य व तेलंगणा राज्य यांच्या अंतर्गत करारामुळे हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. तेलंगणा राज्याच्या हिश्याच्या शिल्लक रक्कमेच्या मागणी संदर्भात नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण साहेबांनी शिष्टमंडळासह तेलंगणा राज्याचे उपमुख्यमंत्री बटी विक्रमा ,राज्याचे पाटबंधारे मंत्री उत्तम कुमार रेड्डी, व पाटबंधारे विभागाचे सचिव प्रशांत पाटील, यांची संयुक्तरीत्या भेट घेऊन तेलंगणा राज्याच्या हिश्याची प्रकल्पग्रस्ताच्या विकासासाठीच्या निधीची मागणी यावेळी करण्यात अली. यावेळी नांदेड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर,प्रदेश सदस्य श्याम दरक, राजनजी देशपांडे यासह प्रकल्पग्रस्त गावातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# प्रारूप विकास आराखड्यावर शेकाप पदाधिकाऱ्यांची चर्चा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर** : कामोठे विभागीय शेकापपक्षाच्या वतीने पनवेल महानगर पालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यावर हरकत घेतली होती. या हरकतीवरील सुनावणी दरम्यान चर्चा विनिमय करून योग्य निर्णय घेतला जाईल असे आश्वासन शेकाप पदाधिकाऱ्यांना महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आले. महानगरपालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यावर शेकाप कामोठे विभाग अध्यक्ष अमोल शितोळे, व्यापारी संघटनेचे सुरेश खरात यांनी हरकत नोंदवली होती. प्रारूप विकास आराखड्यात कामोठे येथील सेक्टर ३४ ते ३६ मधील खाडी किनारी लगत प्रस्तावित असलेला ३० मीटर रुंदीचा रस्ता दाखवण्यात आला नव्हता. मात्र सिडकोच्या नियोजनात या रस्त्याची तरतूद केली होती. या रस्त्यामुळे खाडी किनारच्या इमारतींना खाडीच्या पाण्यापासून संरक्षण मिळणार होते ही बाब शेकापच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिली. कामोठेची लोकसंख्या जवळपास ३ ते ४ चार लाखांच्या आसपास पोहोचली आहे. कामोठे शहरात प्रवेश करण्यासाठी एकच रस्ता असल्याने रस्त्याच्या प्रवेशद्वारावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे सेक्टर ६ अ मधून पर्यायी रस्ता करण्याची मागणी शितोळे व खरात यांनी केली होती. सुनावणी दरम्यान या विषयावर चर्चा झाली. खांदेश्वर स्टेशन जवळील पाणथळ जागेत अनेक परदेशी तसेच दुर्मिळ पक्षी येतात. या ठिकाणी पक्षांचा नैसर्गिक अधिवास आहे. मात्र प्रारूप विकास आराखड्यात या जागेवर इमारतींचे बांधकाम दाखवण्यात आले असल्याने पक्षांचा अधिवासाचा प्रश्न निर्माण झाला आहे. महानगरपालिकेने विचार करून योग्य ते बदल करण्याची मागणी शितोळे आणि खरात यांनी यांनी यावेळी केली. यावर महानगरपालिकेचा नियोजन विभाग योग्य विचार करून निर्णय घेईल असे आश्वासन सुनावणीला उपस्थित असलेल्या नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिले.

# नागोठणे पोलीस ठाणे अंतर्गत रूट मार्च व फ्लॅग मार्चचे आयोजन

दैनिक युवक आधार

नागोठणे : वार्ताहर : पोलिस ठाण्याचे सहा. पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी तसेच रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र दौंडकर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार 23 जानेवारी रोजी सकाळी 10:30 ते 12:30 वाजण्याच्या दरम्यान शहरात कायदा व सुव्यवस्था राखणे व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे या उद्देशाने नागोठणे शहरात रूट मार्च व फ्लॅग मार्च आयोजित करण्यात आला. नागोठणे पोलीस ठाणे अंतर्गत घेण्यात आलेल्या या फ्लॅग मार्चचा मुख्य उद्देश कायदा व सुव्यवस्था राखणे व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे तसेच कायदा व सुव्यवस्था कायम ठेवणे आणि नागरिकांना पोलीस प्रशासन व द्रुत कार्य बल तत्परतेचा संदेश देणे हा होता. सदरील उपक्रमामुळे




नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन समाजातील विश्वास दृढ झाला आहे. सदरील रूट मार्च व फ्लॅग मार्च हा नागोठणे पोलिस ठाणे येथून प्रभू आळी, केएमजी चौक, मोहल्ला, खुमाचा नाका मार्गे छत्रपती शिवाजी महाराज बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच विभागातील बेणसे गाव या ठिकाणी आयोजित करण्यात आला. नागोठणे पोलीस ठाणे व द्रुत कृती दलाचा हा समन्वित प्रयत्न लोकांमध्ये शांतता व सुव्यवस्था टिकवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला असून या मार्चचे नेतृत्व 102 बटालियन, द्रुत कार्य बल (RAF) चे सहायक कमांडट अजीत कुमार अण्णा क्षीरसागर यांनी केले असून त्यांच्यासोबत निरीक्षक दत्तात्रय मोहिते, जनसंपर्क अधिकारी धनंजय गुजर तसेच 34 कर्मचारी तसेच नागोठणे पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

## रमाई जयंतीच्या अध्यक्षपदी प्रशांत वाकळे तर सचिवपदी स्वप्निल पहाडे यांची निवड....

**दैनिक युवक आधार**

**परतूर** –जालना (अशोक ठोके)बहुजनांची आई माता रमाई ची 127 वी जयंती थाटामाटात साजरी करण्यासाठी शासकीय विश्रामगृह परतुर येथे आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली,या बैठकीमध्ये सर्वानुमतेअध्यक्ष पदी प्रशांत वाकळे ,उपाध्यक्ष





सुमित मानकर सचिव पदी स्वप्निल पहाडे, कोषाध्यक्ष राहुल पहाडे यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रदीप साळवे,गवई बाबा, प्रवीण प्रधान, राहुल गणकवार, दीपक मानकर, योगेश प्रधान, अविनाश पाडेवार, मनोज वंजारे, विकास पहाडे, आदर्श सोनपसारे, भीमा जाधव, कुमार लांडगे, सिद्धांत खंडागळे, आकाश गायकवाड, रुपेश पहाडे, सागर अवसरमोल, प्रदीप पहाडे, अमोल पिंपळे, विकास घुगे,निलेश पाडेवार, गणेश शिंदे, अमोल सोनटक्के, प्रथमेश वाघमारे, इत्यादी फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व सर्व समाज बांधव उपस्थित होते.

## मुंबई उपनगरच्या उमेश गुप्ताने पटकावला राज्यस्तरीय शरीरसौष्ठव 'नमो चषक २०२५ किताब'

**पान १ वरुन** महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील, माजी स्थायी समिती सभापती अजय बहिरा, अमर म्हात्रे, विजय घरत, जयवंत देशमुख, भार्गव ठाकूर, अंकुश ठाकूर, विश्वनाथ कोळी, स्वप्नील ठाकूर, शैलेश भगत, स्पर्धा समन्वयक मयुरेश नेतकर, शरीरसौष्ठव स्पर्धा संयोजक दिनेश शेळके, विचुंबे ग्रापंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत इंडियन नेव्हीचा पी. टी. अनबन उपविजेता ठरला, प्रथम उपविजेता मुंबईचा सागर कातुर्डे, उत्कृष्ट पोझर म्हणून मुंबई उपनगरचा हरमित सिंग याने तर प्रगतीकारक शरीरसौष्ठवपटू म्हणून पुण्याच्या विशाल सुरवसे याने मान मिळवला. सांघिक विजेतापद रायगड संघाने, उपविजेता म्हणून पुणे संघाने, तृतीय क्रमांक मुंबई उपनगर, चतुर्थ क्रमांक मुंबई तर सांघिक पाचवा क्रमांक ठाणे पश्चिम संघाने पटकावला. ८५ प्लस वजन गटात प्रथम क्रमांक पी. टी. अनबन (इंडियन नेव्ही), द्वितीय क्रमांक हरमित सिंग (मुंबई उपनगर ), तृतीय क्रमांक सोहम चाकणकर (पुणे ), चतुर्थ क्रमांक निलेश रेमजे (मुंबई), पाचवा क्रमांक अभिषेक लोंढे (मुंबई) तर सहावा क्रमांक जीवन सकपाळ(मुंबई ), तर ८५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक विशाल सुरवसे (पुणे), द्वितीय क्रमांक संदेश सामंत (सिंधुदुर्ग), तृतीय क्रमांक सुखदीप सिंग (रायगड), चतुर्थ क्रमांक अर्जुन शर्मा (ठाणे), पाचवा क्रमांक महेंद्र पाचपुते (पुणे) तर सहावा क्रमांक ऋत्विक जाधव (पुणे) याने पटकावले. ८० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक सागर कातुर्डे (मुंबई), द्वितीय क्रमांक कमलेश अंबारा (पुणे), तृतीय क्रमांक संजय प्रजापती (मुंबई), चतुर्थ क्रमांक अक्षय शिंदे (पुणे ), पाचवा क्रमांक प्रभाकर पाटील (रायगड) तर सहावा क्रमांक सचिन हगवणे (पुणे) , ७५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक भगवान बोराडे (मुंबई उपनगर), द्वितीय क्रमांक आकाश दडमल (पुणे), तृतीय क्रमांक उदय देवरे (रायगड), चतुर्थ क्रमांक विशाल धावडे (उपनगर), पाचवा क्रमांक मंगेश भोसले (पश्चिम ठाणे) तर सहावा क्रमांक अक्षय शिंदे (पुणे), ७० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक उमेश गुप्ता(उपनगर), द्वितीय क्रमांक स्वप्नील नरवडकर (इंडियन नेव्ही), तृतीय क्रमांक संकेत भरम (उपनगर), चतुर्थ क्रमांक दीपक राऊळ (रायगड), पाचवा क्रमांक प्रशांत पोराळे (पुणे) तर सहावा क्रमांक रोशन दळवी (कोल्हापूर ), ६५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक उद्देश ठाकूर (रायगड), द्वितीय क्रमांक नरेंद्र व्हालेकर (पुणे), तृतीय क्रमांक संदीप सावळे (उपनगर ), चतुर्थ क्रमांक सचिन सावंत (पुणे ), पाचवा क्रमांक निलेश धोंडे (पुणे) तर सहावा क्रमांक सचिन बोईनवाड (पश्चिम ठाणे), ६० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक बाळू काटे (पुणे), द्वितीय क्रमांक गणेश पाटील (रायगड), तृतीय क्रमांक जितेश मोरे (मुंबई), चतुर्थ क्रमांक जुगल शिवणे (रायगड), पाचवा क्रमांक सुयश सावंत (उपनगर) तर सहावा क्रमांक अमोल वायल (पुणे), ५५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक हनुमान भगत (रायगड), द्वितीय क्रमांक राजेश तारबे (मुंबई), तृतीय क्रमांक अजय ओजरकर (पुणे), चतुर्थ क्रमांक संजय भोपी (रायगड), पाचवा क्रमांक दीपक कांबळे (पुणे) तर सहावा क्रमांक संदेश भोईर (रायगड), १७१ सेंटीमीटर वरील गटात प्रथम क्रमांक बॉबी पाटील (रायगड), द्वितीय क्रमांक राजेश सिंग (पालघर), तृतीय क्रमांक शुभम पवार (पुणे), चतुर्थ क्रमांक मयूर शिंदे (नाशिक), पाचवा क्रमांक रोहन ठाकूर (रायगड) तर सहावा क्रमांक अक्षय शिंदे (पुणे), १७१ सेंटीमीटर खालील गटात प्रथम क्रमांक रोहन वाणी (रायगड), द्वितीय क्रमांक नरेंद्र वाल्हेकर (पुणे), तृतीय क्रमांक अनिकेत पाटील (रायगड), चतुर्थ क्रमांक निलेश गुरव (उपनगर), पाचवा क्रमांक सचिन बोईनवाड (पश्चिम ठाणे) तर सहावा क्रमांक कौस्तुभ पाटील (रायगड), मास्टर ४० प्लस गटात प्रथम क्रमांक रवींद्र माने (इंडियन नेव्ही), द्वितीय क्रमांक कुमाम कोईरेम्बा (ठाणे), तृतीय क्रमांक दीपक राऊळ (रायगड), चतुर्थ क्रमांक स्वप्नील अशाइत (पालघर), पाचवा क्रमांक चिराग पाटील (पालघर) तर सहावा क्रमांक जयप्रकाश नार्वेकर (सिंधुदुर्ग) याने पटकावला. या सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

